# // प्रकरण - दुसरे //

## अभ्यासाचा विषय

२.१ * संशोधनाचे महत्त्व.

२.२ * संशोधनाची गरज.

२.३ * संशोधनाचे शीर्षक.

२.४ * संशोधनाची उद्दिष्टे.

२.५ * संशोधनाची व्याप्ती.

२.६ * संशोधनाच्या मर्यादा.

२.७ * संशोधनाचे कार्यक्षेत्र

२.८ * संशोधन विषयातील संज्ञाचा अर्थ.

// प्रकरण २ रे //

// अभ्यासाचा विषय //

२.१ ** संशोधनाचे महत्व :-

महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासामध्ये गेल्या साडेतीन दशका-मध्ये अनेक स्थित्यंतरे झाली संख्यात्मक व गुणात्मक विकासामध्ये राष्ट्रीय पातळीवरील कोठारी आयोग [१९६४=६६], मुदलियार आयोग [१९५२-५३] नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ व राममूर्ती आयोग [१९९२] इत्यादींचा वाटा महत्वाचा आहे. या आयोगांच्या शिफारशींचा परीणाम म्हणून काही परिवर्तने केली गेली कोणती? अर्थात सर्वच शिफारशींची काटेकोरपणे अंमलबजावणी झाली नाही. परंतु या शिफारशींचा केंद्रबिंदू शिक्षणाला दर्जा उंचावणे व शिक्षणाचे लोकशाहीकरण करणे हा होता यात मुदत असण्याचे कारण नाही.

परंतु कोणत्याही राष्ट्रीय पातळीवरील आयोगाने विनाअनुदानाचा पुरस्कार केला नसताना महाराष्ट्र शासनाने केवळ राजकीय हेतूने व तत्कालीन परिस्थितीचा भावनिक विचार करून १९८३-८४ पासून विना अनुदान धोरणाचा स्वीकार केला. एखाद्या धोरणाचा शिक्षण क्षेत्रामध्ये स्वीकार करताना त्याचे दीर्घकालीन समाजावर व एकूण शिक्षण प्रक्रियेवर कोणते परिणाम होतील याचा निश्चित अंदाज

होण्याची गरज असते. त्यातून निर्माण होणाऱ्या समस्यांचे निराकरण कसे करता येईल याचे धोरणात्मक नियोजन करावे लागते. तथापि या पैकी फारसे काही घडले नाही याचा परिणाम शिक्षण क्षेत्रात अनेक समस्यांची जाळी निर्माण झाली आणि एकूणच महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रामध्ये गुरफटून गेले. शिक्षणामध्ये पुर्नमूल्यांकनाची सातत्याने गरज असते. तसे फारसे झाले नाही. जे कांही मूल्यमापन केले ते वरवर इमारतीकडे पाहून, प्राध्यापक, सोयीसुविधा पाहून सर्वंकष असे मूल्यमापन झालेच नाही.

विनाअनुदान धोरणामुळे काय घडते? केवळ संख्यात्मक वाढ झाली परंतु गुणवत्तेचे काय? ~~केवळ~~ इमारती, शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी कोणत्या अवस्थेत आहेत? कर्मचाऱ्यांच्या वेतन, सेवानिवृत्ती वेतन याबाबत निश्चित धोरण काय आहे? प्रवेश प्रक्रियेमध्ये गोंधळ दुर्बल घटकांना यामध्ये कितपत सामावून घेतले जाते? वगैरे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

विनाअनुदानाचा पुरस्कार डी.एड. व बी.एड.साठी झाला आणि खरे तर शिक्षणाचा अर्थच बदलून गेला. शिक्षण हे राजकारणाचे साधन बनवले ज्यांच्यावर अनेक पिढ्या घडविण्यासाठी जबाबदारी सोपविली जाते या शिक्षक प्रशिक्षकांवर ज्यादा पैसा, देऊन ज्यादा पैसा घेवून शिक्षण घेणे व देणे हा कुसंस्कार प्रथमच रुजविला जात असेल तर ते कोणत्या त्यागी व सेवाभावी वृत्तीचे ज्ञानदानाचे कार्य करणार? तसेच या भावी शिक्षकांना प्रशिक्षित करणारे प्राध्यापक या महाविद्यालयातील कर्मचारी यांच्या वेतन, निवृत्ती वेतन याबाबत निश्चित धोरण काय आहे? असे अनेक प्रश्न आपणापुढे उभे राहतात. डी.एड. व बी.एड. विद्यालये, महाविद्यालये ही इंजिनिअरिंग, मेडिकलसारखी व्यावसायिक महाविद्यालये आहेत या

चुकीच्या संकल्पनेच्या आधारे अनुदान कक्षेत ही महाविद्यालये व विद्यालये आणता येत नाहीत हा समज झाला. प्रवेश वेतन व सेवाशाश्वती या संदर्भात अनेक समस्या निर्माण झाल्या. या समस्येची मुळे डी.एड. व बी.एड. महाविद्यालये व्यावसायिक आहेत या चुकीच्या संकल्पनेमध्ये आहेत.

सुरुवातीला विनाअनुदान तत्वाचा स्वीकार तात्पुरत्या स्वरुपाचा होता. परंतु गेल्या दहा वर्षामध्ये याची मुळे फार खोलवर गेली आहेत. एक विनाअनुदान संस्कृती निर्माण झाली. अनेक समस्यांना जन्म देणारे धोरण म्हणून आज सर्वत्र मान्य होऊ लागले आहे. आज महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रामध्ये विनाअनुदान हीच एक समस्या बनली आहे. अनेक कुप्रवृत्तींना जन्म देणाऱ्या या धोरणाचा पुनर्विचार होण्याची नितांत गरज आहे. केवळ पैसा वाचतो म्हणून हे धोरण चालू ठेवणे कितपत योग्य आहे? लोकसंख्या वाढीबरोबरच शिक्षणावरील खर्च वाढत असतो. ही बाब स्वीकारायला पाहिजे. विनाअनुदान धोरणामुळे काही आर्थिक बचत होत असेल. फायदा होत असेल परंतु या विनाअनुदान धोरणामुळे शिक्षण क्षेत्रात पावलोपावली अडचणी निर्माण होत आहेत आणि याच धोरणामुळे समाजाचा शिक्षणावर विश्वास कमी होत चालला आहे.

आज आपल्या महाराष्ट्र राज्यात शिक्षण क्षेत्रातील विना अनुदान तत्वावर शाळा, महाविद्यालये तसेच प्रशिक्षण विद्यालय, महाविद्यालये चालू करण्यासाठी शासन परवानगी देत आहे. परंतु शासनाकडून त्यात्या संस्थांसाठी लागणाऱ्या वर्गखोल्या, प्रशिक्षित शिक्षक त्याचे वेतन इतर कर्मचारी, ग्रंथालय, ग्रंथालयातील पुस्तक, प्रयोगशाळा इत्यादींची माहिती ही मिळवून घेतली जाते परंतु प्रत्यक्षात

त्या ठिकाणी जावून, पाहून त्या संस्थांचा अहवाल पाठवला जात नाही. आज बरीच प्रशिक्षण विद्यालये आणि प्रशिक्षण महाविद्यालये चालतात त्यातील किती विद्यालये आणि महाविद्यालये शा शासकीय नियमानुसार शिक्षकांचे वेतन देते? किती शाळांना मैदाने, प्रशिक्षित शिक्षक आहेत? ग्रंथालय आहे काय? प्रयोगशाळा आहे काय? याची तपासणी ही काटेकोरपणे पाहते काय? याची शंका येते. यातूनच संस्थाचालक कर्मचाऱ्यांची पिळवणूक करतात. प्रशिक्षण विद्यालये आणि महाविद्यालये ही देशाची अत्यंत महत्वाची आहेत. कारण प्रत्येक क्षेत्रातील बुध्दीवान, हुशार नागरिक, वैज्ञानिक तंत्रज्ञ, डॉक्टर इंजिनिअर यांना घडवणारे हे शिक्षकच असतात. जर शिक्षकांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले गेले नाही तर देशाची भाविपिढी ही दिशाहीन, अंधारात चाचपडणारी बनेल. असा विचार येतो.

आजच्या स्थितिला अध्यापक विद्यालयामध्ये प्रवेश घेण्यासाठी उच्चमाध्यमिक शालांत परीक्षा ही अट लागू करण्यात आली आहे. तसेच सन १९९४-९५सालापासून या स्तरावरील अभ्यासक्रमात आमूलाग्र बदल करण्यातआला आहे. या शिक्षकांना माध्यमिक स्तरावरील वर्गांना शिकविण्यासाठी पात्र समजण्यात येते. तसेच या स्तरावर ज्या पध्दतीने बी.एड. च्या विद्यार्थी शिक्षकांना केंद्रिय पध्दतीने प्रवेश दिला जातो त्याच पध्दतीने जिल्हा परिषदेमार्फत पदविका अभ्यासक्रमासाठी पण केंद्रिय पध्दतीने प्रवेश देण्याची अंमल-बजावणी इ.स. १९९४-९५ या वर्षापासून चालू करण्यात आली. तसेच त्यांच्या प्रवेशशुल्कातही वाढ करण्यात आली आहे. इत्यादी अनेक बाबतीत अध्यापक विद्यालयांना अडचणी येतात काय? तसेच संस्थाचालकांकडून कांही अडचणी येतात काय? इमारत, प्रशिक्षित शिक्षक,

मराठपाठ, कार्यानुभव इत्यादी बाबतीत त्यांना कोणत्या अडचणी येतात? त्यावर काय उपाययोजना सुचवता येईल? त्या विचारातून अध्यापकाने हा विषयक निवडला आहे.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासामध्ये महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बापूजी साळूंखे, कर्मवरी भाऊराव पाटील, कर्मवीर मामासाहेब जगदाळे आदींचे योगदान फार मोठे आहे. यांनी शिक्षणाची गंगा तळागाळापर्यंत नेण्याचे कार्य केले. शिक्षणाचा बंद दरवाजा उघडला, शिक्षण मुक्त केले परंतु आज समाजातील पिडीत, मध्यम वर्गातील लोकांना हा दरवाजा बंदिस्त वाटत आहे. शिक्षण स्वस्त होण्या-ऐवजी महाग झाले, शिक्षण मुक्त होण्यासाठी अनेक पिढ्या जाव्या लागल्या. तथापि तो दरवाजा बंद होण्याची प्रक्रिया मात्र अल्पा-वधीत घडत आहे. ही खरी महाराष्ट्राच्या शिक्षणाची शोकांतिका आहे. [६]

१.२ ** संशोधनाची गरज :-

स्वातंत्र्योत्तर काळात लोकसंख्या झपाट्याने वाढत गेली. त्याच प्रमाणात खाजगी शाळांची संख्याही वाढत गेली. शाळांची संख्या वाढली त्यामुळे शाळेत अध्यापन करणाऱ्या शिक्षकांची कमतरता भासू लागली काही समाजसुधारकांनी, शिक्षणप्रेमींनी शिक्षकांची समस्या सोडविण्यासाठी उदात्त हेतुने प्रेरित होवून प्रशिक्षण विद्यालये आणि महाविद्यालये सुरु करुन प्रशिक्षित शिक्षकांची अडचण दुर करण्याचा प्रयत्न केला. परंतु इ.स. १९८३ मध्ये महाराष्ट्र सरकारने

विनाअनुदान तत्वाचे धोरण स्विकारल्यामुळे गावोगाव शैक्षणिक संस्था सुरु झाल्या. गावोगाव खाजगी शिक्षण संस्था सुरु झाल्यामुळे आणि शासनाच्या किमान वय वर्षे १४ पर्यंतचे शिक्षण मोफत केल्यामुळे शिक्षणाचा प्रसार वाढू लागला. शाळेतील विद्यार्थी संख्या वाढू लागली. प्रशिक्षित शिक्षकांची समस्या पुढे आली. आणि त्यामुळे कांही खाजगी शिक्षण संस्थांनी प्रशिक्षित शिक्षक मिळावेत म्हणून अध्यापक विद्यालयांची स्थापना केली. आणि आज विनाअनुदान शैक्षणिक संस्था हीच एक शिक्षण क्षेत्रातील फार मोठी समस्या झाली आहे.

आजच्या आधुनिक काळात लोकसंख्येच्या विस्फोटा बरोबरच शिक्षण क्षेत्रातही नवनविन तंत्रज्ञान येत आहे. रोज वेगवेगळे शोध लागत आहेत. मनुष्याची ज्ञान संपादन करण्याची पातळी उंचावत आहे. आज शिक्षण क्षेत्रात एवढी प्रगती झाली आहे की, रोज नवनवि शोध लागत आहेत. आणि आपल्या महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदान शैक्षणिक धोरण ही एक समस्या उग्र स्वरुप धारण करत आहे.

शिक्षण ही राष्ट्रीय गुंतवणूक आहे. शिक्षणरूपी इमारतीचा पाया हा प्राथमिक शिक्षण आहे. आणि हा पाया तयार करणारा, घडवणारा कारागीर म्हणजे शिक्षक आहे. अध्यापक विद्यालयातून पदवीका घेवून बाहेर पडणारे विद्यार्थी हे प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून पात्र असतात, हे देशाचे भावी नागरिक, देशाचे आधारस्तंभ घडविणाऱ्या शिक्षकांना विनाअनुदान अध्यापक विद्यालयातून शिक्षण घ्यावे लागत आहे. अशा अध्यापक विद्यालयात म्हणजेच या विनाअनुदान अध्यापक विद्यालयात कांही अपवाद वगळता किती अध्यापक

विद्यालयात खरोखरी अध्यापक प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबवला जातो. आज यांना स्परोधाने असे म्हटले जाते आहे की, हे प्रशिक्षण देणारे अध्यापक विद्यालय नसून शिक्षक तयार करणारे कारखाने आहेत. या कारखान्यासाठी इमारत लागते. अनुभवी अध्यापक लागतात. सुसज्ज ग्रंथालय, लागते, खेळण्यासाठी मैदान लागते, वेगवेगळ्या विषयांसाठी वर्गखोली लागतात, शैक्षणिक साधने लागतात. इत्यादी गोष्टीची पुर्तता करणारे विद्यालय, तसेच अभ्यासक्रम व्यवस्थित राबवणारे अध्यापक जर योग्य प्रकारे आपले दैनंदिन कामकाज पार पाडत असतील. शिक्षणातील अधुनिक तंत्राचा वापर कसा करावा हे व्यवस्थित अध्यापना द्वारे स्पष्ट करत असतील तर त्या अध्यापक विद्यालयामधून प्रशिक्षण घेवून बाहेर पडणारा अध्यापक हा निश्चितच चांगले, नागरिक, देशाचे आधारस्तंभ निर्माण करेल यात शंका नाही.

आज समाजाच्या अपेक्षा या इतर व्यवसायापेक्षा शिक्षकांकडून फार वेगळ्या आहेत. परंतु विनाअनुदान अध्यापक विद्यालयातून शिक्षण घेवून बाहेर पडणाऱ्या अध्यापकाकडून आपण कोणत्या अपेक्षा बाळगाव्यात हीच एक समस्या आहे. अशा प्रशिक्षण संस्थांमध्ये काम करणारे अध्यापक, कर्मचारी यांना अनुदानित अध्यापक विद्यालयातील अध्यापकांसारख्या सोयी, सुविधा आहेत का? याचा समाज आणि शासन विचार करते काय? संस्थाचालकांचा मनमानी कारभार, बिगर अध्यापन कक्ष, ग्रंथालय अध्यायन अनुभव किती मिळाले? याचा आपण विचार करत नाही. जर प्रशिक्षणार्थीला योग्य मार्गदर्शन मिळाले नाही तर त्यांच्याकडून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वाढत्या ज्ञानकक्षेला त्यांच्या शंकाचे निरसन कसे करावे हा विचार येतो.

अशी ही अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया असलेला शिक्षण हा उद्योग, उद्याचे नागरिक उत्पादक, उद्योजक, संशोधक, शासक आणि प्रशासक निर्माण करणाऱ्या शिक्षकांचे प्रशिक्षण हे योग्य प्रकारे, योग्य मार्गाने होते का? त्यांना कोणकोणत्या प्रकारच्या अडचणी येतात. या सर्व शैक्षणिक गरजा वरून सदरील प्रकल्पाच्या संशोधनाची गरज अभ्यासकाला वाटते.

२.३ ** संशोधनाचे शीर्षक :-

शोध प्रबंधासाठी अभ्यासकाने, "उस्मानाबाद जिल्ह्यातील विनाअनुदानीत अध्यापक विद्यालयातील प्रशासकीय समस्यांचा चिकित्सक अभ्यास" हा विषय निवडला आहे.

राष्ट्राच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी, निरक्षरता नष्ट करून, साक्षर, सुविचारी, बुध्दीमान व्यक्ति घडविणे हे शिक्षणाचे काम आहे, शिक्षणप्रक्रियेतील अनेक घटकांपैकी विद्यार्थी आणि शिक्षक हे दोन घटक महत्वाचे आहेत. मुलांनी शिक्षण देण्यासाठी अध्यापक असावे लागतात. अध्यापक होण्यासाठी त्याला अध्यापकांसाठी निर्धारित केलेला पदविका अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करावा लागतो मगच त्याला अध्यापक होता येते. आज आपल्या महाराष्ट्र राज्यात जवळजवळ प्रत्येक मोठ्या गावात अध्यापकांना प्रशिक्षण देण्यासाठी विनाअनुदान तत्वावर अध्यापक विद्यालये सुरु आहेत. आज आपली वाटचाल ही २१ व्या शतकाकडे चालू आहे. यंत्रयुगाकडे वाटचाल सुरु आहे. या वैज्ञानिक युगाला सामोरे जात असताना, वेगवेगळे नवनविन शोध लागत असताना शिक्षकाची भुमिका कोणती असेल?

त्याला कोणकोणत्या प्रकारचे ज्ञान मिळवावे लागेल? याचा विचार न करता अध्यापक विद्यालयातून दरवर्षी शेकडो अध्यापक प्रशिक्षण घेवून बाहेर पडत आहे.

आजच्या स्थितीला जर वेळीच शिक्षक प्रशिक्षण देणाऱ्या अध्यापक विद्यालय आणि अध्यापक महाविद्यालयात मिळणारे अध्यापन अनुभव, संस्थांचे प्रशासन, अध्यापन कार्य करणारे प्रशिक्षक यांच्या योग्यतेवर जर भर दिला तर उद्याची पिढी ही चांगले प्रशिक्षण घेतल्यामुळे निश्चितपणे सुजाण, सुसंस्कृत बुध्दीमान तयार होईल याबद्दल शंका नाही. कारण त्यांना शिकविण्याऱ्या शिक्षकाचे प्रशिक्षण जर उच्च प्रतीचे झाले तर त्याच्याकडून निर्माण होणाऱ्या पिढीस तो चांगले, सुजाण नागरिक निर्माण करण्यासाठी झटेल. म्हणूनच म्हटले जाते की, "यथा राजा तथा प्रजा" तद्वतच "यथा अध्यापक तथा विद्यार्थी" असे म्हणावे लागते.

शिक्षकाच्या व्यवसायात आधुनिक कालात प्रशिक्षणाला फार महत्व प्राप्त झाले आहे. पूर्वप्राथमिक शिक्षकांचे प्रशिक्षण, प्राथमिक शिक्षक, प्रशिक्षण, माध्यमिक शिक्षकांचे प्रशिक्षण, तंत्रशिक्षक, कार्यानुभव शिक्षक, चित्रकला शिक्षक इत्यादी अनेक प्रकारचे शिक्षक शाळांना लागतात. जरी निव्वळ प्रशिक्षणाने चांगला शिक्षक बनण्याची खात्री नसली, तरी ज्यावेळी हजारो, लाखोंच्या संख्येने शिक्षकांची आवश्यकता भासते, त्यावेळी त्यांना चांगले प्रशिक्षण देणे हाच एक उपाय आहे. प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमात तात्विक व प्रात्यक्षिक असे दोन भाग असतात. शिक्षणशास्त्र, मानसशास्त्र, आधुनिक पध्दती, विषयशिक्षण

पद्दती या तात्विक भागात व प्रात्यक्षिक भागात निरीक्षण, पाठ घेणे, वर्ग चालवणे, इत्यादी गोष्टी येतात अर्थात पुष्कळ अनुभव मिळाल्यानंतरच तो चांगला शिक्षक होण्याची शक्यता आहे. म्हणून अनुदानित अध्यापक विद्यालय असो वा विनाअनुदानित अध्यापक विद्यालय असो प्रशिक्षणार्थीला जास्तीत जास्त अध्यापन अनुभव मिळाले पाहिजे आणि ध्येयवादी शिक्षक बनले पाहिजेत कारण देशाच्या प्रगतीला अतिउच्च पातळीवर नेणारा हा शिक्षकच आहे. म्हणूनच अभ्यासकाने. "उस्मानाबाद जिल्ह्यातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रशासकीय समस्यांचा चिकित्सक अभ्यास", या विषय निवडला आहे.

## २.४ ** संशोधनाची उद्दिष्टे :-

अभ्यासकाने प्रशिक्षण, या शिक्षण क्षेत्रातील विना-अनुदानित अध्यापक विद्यालयाच्या प्रशासकीय समस्येचा अभ्यास करण्यासाठी खालील उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

०१] अध्यापक विद्यालयातील शैक्षणिक, प्रशासन, अध्ययन अध्यापनाच्या बाबतीत येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करून उपाय सुचविणे.

०२] अध्यापक विद्यालयात प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थींच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करून उपाय सुचविणे.

०३] अध्यापक विद्यालयातील भौतिक सुविधांचा अभ्यास करून उपाय सुचविणे.

४] अध्यापक विद्यालयात काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आर्थिक, सामाजिक, प्रशासनिक समस्यांचा अभ्यास करून उपाय सुचविणे.

५] उस्मानाबाद जिल्ह्यातील मुला - मुलींच्या अध्यापक विद्यालयातील सामाजिक समस्यांचा अभ्यास करून उपाय सुचविणे.

६] अध्यापक विद्यालयातील प्रवेश संबंधीच्या समस्यांचा अभ्यास करून उपाय सुचविणे.

७] अध्यापक विद्यालयातील ग्रंथालयीन सुविधांचा अभ्यास करून उपाय सुचविणे.

८] अध्यापक विद्यालयात काम करणाऱ्या शिक्षकांच्या शैक्षणिक दर्जाचा अभ्यास करणे.

## २.५ ** संशोधनाची व्याप्ती **

" उस्मानाबाद जिल्ह्यातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रशासकीय समस्यांचा चिकित्सक अभ्यास " या शोध प्रबंधाच्या विषयाचा अभ्यास करताना अभ्यासकाने उस्मानाबाद जिल्ह्यात येणाऱ्या [उस्मानाबाद, कळंब, तुळजापूर, परंडा, भूम, उमरगा, तालुके] विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, प्रशिक्षणार्थी, प्रशिक्षणार्थीनी यांची निवड केलेली आहे.

१] प्राचार्य - ०४

२] प्राध्यापक - २४

३] प्रशिक्षणार्थी - } ८०

४] प्रशिक्षणार्थीनी - }

म्हणजेच अभ्यासकाने सदरील शोध निबंधासाठी उस्मानाबाद जिल्हयात येणाऱ्या चार विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील ०४ प्राचार्यांची, २४ प्राध्यापकांची, प्रशिक्षणार्थींची आणि ८० प्रशिक्षणार्थींनी मिळून एकूण १०८ व्यक्तिंची निवड केलेली आहे.

१] प्राचार्य : ०४
२] प्राध्यापक : २४
३] प्रशिक्षणार्थी ]८०
४] प्रशिक्षणार्थीनी ]

म्हणजेच अभ्यासकाने सदरील शोध निबंधासाठी उस्मानाबाद जिल्हयात येणाऱ्या चार विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील ०४ प्राचार्यांची, २४ प्राध्यापकांची, प्रशिक्षणार्थींची आणि ८० प्रशिक्षणार्थींनी मिळुन एकूण १०८ व्यक्तिंची निवड केलेली आहे.

२.६ ** संशोधनाच्या मर्यादा :-

०१] उस्मानाबाद जिल्हयातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांसाठी मर्यादित आहे. अनुदानितचा विचार केलेला नाही.

०२] उस्मानाबाद जिल्हयातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांच्या प्रशासकीय समस्यांपुरते मर्यादित राहिल.

०३] हे संशोधन इ.स. १९९४ ते १९९६ या दोन वर्षांपुरतेच मर्यादित आहे.

०४] उस्मानाबाद जिल्हयातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील ०४ प्राचार्यांसाठी मर्यादित आहे.

०५] उस्मानाबाद, जिल्ह्यातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील २४ अध्यापकांसाठी मर्यादित आहे.

०६] उस्मानाबाद जिल्ह्यातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या ८० प्रशिक्षणार्थी / प्रशिक्षणार्थींनी साठी मर्यादित आहे.

०७] विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील सामाजिक समस्यांचा विचार आहे.

०८] विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील आर्थिक समस्या कोणकोणत्या आहेत याचा विचार केला आहे.

०९] सुक्ष्म अध्यापन, सराव पाठाचे वेळी येणाऱ्या समस्यांचा विचार येथे केला आहे.

१०] सह शिक्षण [मुले / मुली] घेत असताना येणाऱ्या समस्या कोणकोणत्या आहेत याचा विचार केला आहे.

वरील सर्व समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणजेच त्या समस्या दूर करण्यासाठी व त्यावर उपाय सुचविणे या सर्व गोष्टींचा विचार प्रस्तुत शोध निबंधात करण्यात आला आहे.

२.७ ** <u>संशोधनाचे कार्यक्षेत्र</u> :-

अ] <u>उस्मानाबाद जिल्हा</u> :-

१] श्रमजिवी अध्यापक विद्यालय, उमरगा.

२] अध्यापक विद्यालय, परांडा

३] तेरणा अध्यापक विद्यालय, उस्मानाबाद.

४] अध्यापक विद्यालय, गिरवली, ता. भूम.

[ब] अध्यापक विद्यालयाचे ०४ प्राचार्य.

[क] अध्यापक विद्यालयाचे २४ प्राध्यापक.

[ड] अध्यापक विद्यालयातील ८० प्रशिक्षणार्थी.

अशा एकूण चार अध्यापक विद्यालयातील प्राचार्य ०४, प्राध्यापक २४ आणि प्रशिक्षणार्थी ८० मिळून एकूण १८० प्रश्नावल्या पाठविल्या आहेत.

२.८ ** संशोधन विषयातील संज्ञा अर्थ :-

** विषय : "उस्मानाबाद जिल्हयातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रशासकीय समस्यांचा चिकित्सक अभ्यास."

१] विनाअनुदान : ज्या अध्यापक विद्यालयांना शासकीय कोषागारातून आर्थिक स्वरुपात अनुदान मिळत नाही अशी अध्यापक विद्यालये.

२] अध्यापक विद्यालय : उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थ्यां दोन वर्षांचा पदविका घेवून प्रशिक्षित होतात त्या प्रशिक्षणसंस्थांना अध्यापक विद्यालय म्हणतात.

३] <u>प्रशिक्षण</u> : ज्या शिक्षणसंस्थात शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाते त्यांना प्रशिक्षणसंस्था म्हणतात.

४] <u>शिक्षक</u> : शिकविणारा तो शिक्षक.

५] <u>समस्या</u> : शिक्षण क्षेत्राशी संबंधित एका किंवा अनेक व्यक्तींना भेडसावणारी, प्राप्त मानवी ज्ञानाची निश्चिती, त्यात विस्तार, बदल किंवा नविन ज्ञान निर्माण करणारी, सैध्दांतिक किंवा प्रात्यक्षिक क्षेत्रातील अडचण किंवा असमाधान म्हणजे समस्या.

६] <u>अभ्यास</u> : एखाद्या गोष्टीची आवड किंवा ती गोष्ट करण्याचा व्यासंग होय.

७] <u>संशोधन म्हणजे</u> : ज्ञानाच्या एखाद्या शाखेत नविन तथ्ये किवा तत्व शोधण्यासाठी किवा जुनी तथ्ये किंवा तत्वे तपासण्यासाठी काळजीपूर्वक आणि पध्दतशीर केलेला अभ्यास होय.

८] <u>चिकित्सक</u> : परीक्षा करणारा, कलावंत, एखाद्या गोष्टीचा कीस काढणारा.

९] <u>शिक्षण म्हणजे</u> : व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास किंवा व्यक्तित्वाचा विकास होय.

<u>शिक्षण म्हणजे</u> : व्यक्तिच्या विकासाची प्रक्रिया होय. या प्रक्रियेमध्ये सामाजिक स्थिती, गतीचा विकास

सर्वांगीण विकास जाणीवपूर्वक अंगीकारणे, सुसंस्कार अंगी आणून, व्यक्तिमत्वाचा विकास साधणे होय.

इंग्रजीत शिक्षणाला *Education.* असा शब्द आहे. [७]

====================

====

## / संदर्भ सूची /


१] डॉ. शिवणेकर ल.मा. :-

माध्यमिक शिक्षण संरचना व कार्यपध्दती
नूतन प्रकाशन, प्रथमावृत्ती ११/२/९२
पेज - ७० ते ८६.

२] श्री. आळेंदकर ज.श्री. :-

शिक्षणाचे व अध्यापनाचे शास्त्र
श्री. लेखन वाचन भांडार ठोकळ भवन
लक्ष्मी रस्ता, पुणे-२ प्रथमावृत्ती १९६८
पेज - ११० ते १५, १६६ ते ७१.

३] डॉ. बापट भा.गो. :-

शैक्षणिक संशोधन
नूतन प्रकाशन पूणे. आवृत्ती ३ री
२६/१/८८
पेज. १० ते १५.

४] श्री. सोहोनी श्री.कृ. :-

शैक्षणिकदीपावेशा
सौ. सुधा श्री. सोहोनी, गुलमोहर
ब्लॉक-१, पेशवे पार्क पुणे-३० आवृत्ती
प्रथम १/५/९३.
पेज ६. १०, २६१ ते ६२, ४२६

[५] डॉ. भिंताडे वि.रा. :-

शैक्षणिक संशोधन पध्दती
नूतन प्रकाशन पुणे - ३०,
प्रथमावृत्ती - नोव्हेंबर १९८९
पेज - ३ ते १३.

[६] दै. लोकमत (सोलापूर) :-

८/६/१९९५.
प्रा. डॉ. एच.के. गुरव.

[७] प्रा. कुंडले म.बा. :-

शैक्षणिक तत्वज्ञान, शै. समाजशास्त्र
पान नं. ९

[८] प्रा. घाटोळे रा.ना :-

समाजशास्त्रीय संशोधन तत्व आणि
पध्दती - १९८३.
पान नं. ५

================